| वर्ष - 9 | अंक -34 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™



आज तिसरी माळ
चंद्रघंटा देवी

### आतील पानांत


- खेळाडूंच्या अतिरिक्त सहाय्यकांवर निर्बंध
- भारताचा ऑस्ट्रेलियावर मोठा विजय
- अंत्यसंस्काराचा आदर केला पाहिजे
- जमवाने भाजपा कार्यालय पेटवलं


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 25 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हाय अलर्ट जारी — हवामान विभाच्या नव्या इशाऱ्यानं चिंता वाढली

# महाराष्ट्रावर आता आणखी एक मोठं संकट!

## मराठवाडा–विदर्भाला सर्वाधिक फटका; शेतकरी हवालदिल, नद्यांना पूर, अनेक गावांचा संपर्क तुटला



| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे राज्यात मोठं नुकसान झालं आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. दरम्यान पुन्हा एकदा हवामान विभागाकडून राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार असून येत्या 25 सप्टेंबर पासून ते 29 सप्टेंबरपर्यंत पावसाचा धोका कायम आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होणार आहे. तर 27 सप्टेंबरला राज्यभरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.**

पुढील 24 तासांमध्ये बंगालच्या उपसागरात कमी दबाचा पट्टा निर्माण होणार आहे, त्यामुळे पुढचे पाच दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार 25 सप्टेंबर पासून ते 29 सप्टेंबरपर्यंत राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. तर येत्या 27 सप्टेंबरला मराठवाड्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे याच काळात विदर्भात देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मराठवाडा आणि विदर्भाला पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. दरम्यान बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार बांधवांना समुद्रात न जाण्याचं आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आलं आहे.

### महाराष्ट्रात काय स्थिती?

हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. यंदा सर्वाधिक फटका हा मराठवाड्याला बसला आहे, पिकांचं मोठं नुकसान झालं आहे, दरम्यान पुढील तीन ते चार दिवस मराठवाड्यात पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. तसेच विदर्भात ढगाळ वातावरण राहणार असून, अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हवामान खात्याकडून आता नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**पावसामुळे मोठं नुकसान**

राज्यात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे, पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. मराठवाड्याला तर पावसाचा सर्वात मोठा फटका बसला आहे. उभी पिकं पाण्याखाली गेली असून, शेतकरी हवालदिल झाली आहेत, नद्यांना आलेल्या पुरामुळे तर परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, अनेक जण गावातच अडकले आहेत, त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्याचं काम सुरू आहे.पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्त भागांना भेटी देऊन, नुकसानाचा आढावा घेतला.

15 ऑक्टोबरपर्यंत राज्यातून मान्सून परतू शकतो, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे, मात्र त्यापूर्वी देशातील अनेक राज्यांमध्ये आयएमडीकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. देशासह राज्यामध्ये यंदा मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला होता, महाराष्ट्रात सरासरी सात जूनच्या आसपास मान्सून दाखल होतो. मात्र यंदा 26 मे रोजीच त्याचं राज्यात आगमन झालं होतं. यंदा राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालं आहे. राज्यातील अनेक गावांना पुराचा वेढा पडला आहे, घरादारात पाणी शिरलं आहे. शेतीमधील पिकंच नाही तर शेती देखील वाहून गेली आहे. ऐन हातातोंडाशी आलेला घास असा निसर्गानं हिरावून घेतल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पावसानं राज्यभरात धुमाकूळ घातलेला असतानाच आता भारतीय हवामान विभागाच्या नव्या अंदाजानं चिंता वाढवली आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आता पावसाच्या परतीचा प्रवास सुरू झाला आहे. 15 सप्टेंबरपासून मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. येत्या 12 ते 15 ऑक्टोबरपर्यंत मान्सून भारतातून पूर्णपणे परतेल, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

मात्र जाता-जाता पुन्हा एकदा पाऊस मोठा दणका देणार असल्याचा अंदाज देखील हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलं आहे. 24 ते 27 सप्टेंबर दरम्यान देशातील अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आजपासून पुढील दोन दिवस ओडिशा, आंध्र प्रदेश, आणि झारखंडमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच महाराष्ट्राला देखील हवामान विभागाकडून मोठा इशारा देण्यात आला आहे.

**मेट्रोचे काम सुरू**

## रस्त्याची दुरुस्ती करण्यास महामेट्रो तयार

# पक्क्या रस्त्यासाठी वाहतूक वळविण्याची मागणी

## रस्ता पक्का करून देण्याची तयारी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मेट्रोचे काम सुरू असल्याने निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प ते चिंचवड स्टेशनपर्यंतच्या सेवा रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. नागरिकांचा रोष वाढल्यानंतर महामेट्रोने सेवा रस्ता पक्का करून देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, पक्का रस्ता करण्यासाठी काही दिवस या मार्गावरील वाहतूक बंद करून इतरत्र वळविण्याची मागणी महामेट्रोने महापालिका व वाहतूक पोलिसांकडे केली आहे. वाहतूक वळवून रस्ता मोकळा करून देताच पक्का रस्ता तयार केला जाईल, असे पुणे महामेट्रो प्रशासनाने सांगितले.**



पिंपरी ते निगडी मेट्रो विस्तारित मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवडच्या एम्पायर इस्टेटपर्यंतचा सेवा रस्ता आणि बीआरटी मार्ग महापालिकेने महामेट्रोकडे हस्तांतरित केला आहे. हे अंतर ४.५ किलोमीटर इतके आहे. या रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महामेट्रोकडे देण्यात आली आहे. सध्या भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवड स्टेशनपर्यंत मेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्ता, बीआरटी मार्ग खोदून खांबाची उभारणी, 'व्हायाडक्ट'चे काम सुरू आहे. विनाअडथळा काम करता यावे, यासाठी महामेट्रोने या मार्गावर सुरक्षा कठडे (बॅरिकेड) लावले आहेत. त्यामुळे सेवा रस्ता प्रचंड अरुंद झाला आहे. पदपथ उखडून तेथे रस्ता करण्यात आला आहे. अरुंद रस्ता, त्यात वाहनांची मोठी वर्दळ आणि पावसामुळे पडलेले खड्डे यामुळे वाहतूक संथ होऊन कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागतात. दहा मिनिटांच्या अंतरासाठी अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ लागतो. खड्ड्यांबाबत सामाजिक संघटना, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवकांनी वारंवार तक्रार करूनही त्याची दखल घेतली जात नव्हती. खड्डेदुरुस्तीबाबत महापालिकेने महामेट्रोला तीन वेळा पत्र पाठविले. मात्र, महामेट्रोकडून त्याची दखल घेतली जात नसल्याने खड्डेमय रस्त्यांवरूनच वाहतूक सुरू आहे. आता, या मार्गावरील वाहतूक काही दिवसांसाठी बंद केल्यास रस्ते पक्के करून देऊ, असा प्रस्ताव महामेट्रोने दिला आहे.निगडी ते चिंचवड स्टेशन मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्ते दुरुस्त केल्यानंतरही पावसामुळे वारंवार खड्डे पडत आहेत. या मार्गावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने वळवून काही दिवस बंद करावी. त्यानंतर हा रस्ता पक्का केला जाईल.श्रावण हर्डीकर,व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो महामेट्रो व्यवस्थापनाने रस्तेदुरुस्तीचा कालावधी कळवावा. वाहतूक पोलिसांशी समन्वय साधावा.निगडी ते चिंचवड स्टेशन मार्गावरील वाहतूक बंद करण्यासाठी महापालिका प्रशासन पूर्ण सहकार्य करील. पिंपरी ते निगडी मेट्रो विस्तारित मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवडच्या एम्पायर इस्टेटपर्यंतचा सेवा रस्ता आणि बीआरटी मार्ग महापालिकेने महामेट्रोकडे हस्तांतरित केला आहे. हे अंतर ४.५ किलोमीटर इतके आहे. या रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महामेट्रोकडे देण्यात आली आहे. सध्या भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक ते चिंचवड स्टेशनपर्यंत मेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्ता, बीआरटी मार्ग खोदून खांबाची उभारणी, 'व्हायाडक्ट'चे काम सुरू आहे. विनाअडथळा काम करता यावे, यासाठी महामेट्रोने या मार्गावर सुरक्षा कठडे (बॅरिकेड) लावले आहेत. त्यामुळे सेवा रस्ता प्रचंड अरुंद झाला आहे. पदपथ उखडून तेथे रस्ता करण्यात आला आहे. अरुंद रस्ता, त्यात वाहनांची मोठी वर्दळ आणि पावसामुळे पडलेले खड्डे यामुळे वाहतूक संथ होऊन कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागतात. दहा मिनिटांच्या अंतरासाठी अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ लागतो. खड्ड्यांबाबत सामाजिक संघटना, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवकांनी वारंवार तक्रार करूनही त्याची दखल घेतली जात नव्हती.

### पावसामुळे खड्डे पडत आहेत

खड्डेदुरुस्तीबाबत महापालिकेने महामेट्रोला तीन वेळा पत्र पाठविले. मात्र, महामेट्रोकडून त्याची दखल घेतली जात नसल्याने खड्डेमय रस्त्यांवरूनच वाहतूक सुरू आहे. आता, या मार्गावरील वाहतूक काही दिवसांसाठी बंद केल्यास रस्ते पक्के करून देऊ, असा प्रस्ताव महामेट्रोने दिला आहे.निगडी ते चिंचवड स्टेशन मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्ते दुरुस्त केल्यानंतरही पावसामुळे वारंवार खड्डे पडत आहेत.

# पुरंदर विमानतळासाठी प्रत्यक्ष मोजणी

## 95 टक्के शेतकऱ्यांची संमतिपत्रे दाखल; आज अंतिम मुदत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी संमतिपत्रे देण्याची मुदत आज, गुरुवारी (२५ सप्टेंबर) संपणार असल्याने शुक्रवारपासून (२६ सप्टेंबर) विमानतळासाठीच्या प्रत्यक्ष जमीनमोजणीस सुरुवात होणार आहे. त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, आतापर्यंत ९५ टक्के शेतकऱ्यांनी संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाकडे दिली आहेत.**



पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे सरकारने साडेसातऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. त्यानुसार सहमती संमतिपत्रे देण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती.

या कालावधीत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिली. त्यानंतर संमतिपत्रे देण्यासाठी गुरुवारपर्यंत (२५ सप्टेंबर) मुदतवाढ देण्यात आली.

त्यानुसार आतापर्यंत ९५ टक्के शेतकऱ्यांनी विमानतळासाठी जागा देण्याची तयारी दर्शविली असून, संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत. विमानतळासाठी सुमारे तीन हजार एकर जमीन घेण्याचे नियोजन आहे. मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

### विकसित भूखंडांचे वाटप

पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे २०० एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे भूसंपादित जमिनीसह विमानतळासाठी सुमारे २९०० एकर जमीन उपलब्ध होणार आहे. दरम्यान, संमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर 'एरोसिटी'त एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येणार आहे.

## प्रारूप प्रभाग रचना — अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाला सादर

# पिंपरी चिंचवड शहरात पाच लाख मतदार वाढले!

## नवमतदारांमुळे मतदारसंख्येत भर; प्रशासनाकडून दावा; नवमतदार ठरवणार भावी नगरसेवक

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासकीय कामकाज सुरु झाले आहे. महापालिकेच्या प्रारुप प्रभाग रचना देखील अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाला सादर केली आहे. मात्र, महापालिकेच्या निवडणुकीसाठी २०१७ मध्ये ११ लाख ९२ हजार ०८९ मतदारसंख्या होती. गेल्या आठ वर्षात या आकडेवारीत वाढ होवून यंदा महापालिकेच्या निवडणुकीत तब्बल ५ लाख १६ हजार ६९८ एवढे मतदार वाढले आहेत. यामध्ये शहरातील लोकसंख्येत झालेली वाढ आणि नवमतदारामुळे मतदार संख्येत वाढ झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे.**




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना अंतिम करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. महापौर पदाचे आरक्षण निश्चितीसाठी शासनाने माहिती मागविली आहे. त्यामुळे महापालिका सार्वत्रिक निवडणुक ही दिवाळीनंतर निश्चित होणार आहेत.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती घेवून सुनावणी पार पडली आहे. आता प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठवण्यात आली असून ६ ऑक्टोबर पर्यंत अंतिम स्वरुप मिळणार आहे. त्यानंतर महापालिकेच्या एससी, एसटी आणि ओबीसी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे.

महापालिकेच्या निवडणुक विभागाकडून प्रशासकीय पातळीवर जोरदार तयारी सुरु केली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुका ह्या दिवाळीनंतर जानेवारी २०२६ मध्ये होणार आहेत. त्यानूसार प्रशासनाकडून कामकाज वाटप, निवडणुकीच्या अनुषंगाने पुर्व तयारी करण्यात येवू लागले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आल्या. त्यानंतर त्यांची मुदत १३ मार्च २०२२ रोजी नगरसदस्याचा कार्यकाळ संपला. आता प्रशासकीय राजवटीत देखील साडेतीन वर्ष पुर्ण झाली आहेत. महापालिकेची निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. सन २०१७ मध्ये शहराची मतदारसंख्या ११ लाख ९२ हजार ०८९ इतकी आहे. त्यानंतर शहराची मतदार संख्येत 5 लाखांनी भर पडली आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक होत आहे. शहराची लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ इतकी होती. ही लोकसंख्या आता ३० लाखांच्या आसपास आहे. त्यामुळे मतदार संख्येतही मोठी वाढ झालेली आहे. फेब्रुवारी २०१४ आणि फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत सन २०११ ची लोकसंख्या ग्राह्य धरण्यात आली होती. फेब्रुवारी २०१७ नंतर आता ही निवडणुकीसाठी सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रभागरचना करण्यात आली आहे. असे असले तरीही, आतापर्यंतच्या मतदार संख्या लक्षात घेऊन प्रभाग निहाय मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. सध्यस्थितीत शहरात एकूण १७ लाख ८ हजार ७८७ एवढी मतदारसंख्या असून सन २०१७ नंतर ५ लाख १६ हजार ६९८ इतकी मतदार संख्येत वाढ झालेली आहे.

यामध्ये चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक 6 लाख 79 हजार 858 इतके मतदार आहेत. त्यात 3 लाख 56 हजार 525 पुरुष आणि 3 लाख 23 हजार 274 महिला व 59 तृतीयपंथी मतदार आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघात एकूण 6 लाख 29 हजार 129 मतदार आहेत. त्यात पुरुष 3 लाख 38 हजार 322, महिला 2 लाख 90 हजार 707 व तृतीयपंथी 100 मतदार आहेत.

### कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मतदार याद्या

राज्य निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा कार्यक्रम अद्याप आलेला नाही. मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पालिका निवडणूक विभागाकडून प्रभागनिहाय मतदार यादीचे काम करण्यात येणार आहे.विधानसभेची मतदार यादी फोडून २ १ ते ३२ अशी प्रभागात विभागली जाईल. त्या ३२ मतदार याद्या पालिकेकडून उपलब्ध करण्यात येतील. एका प्रभागात मतदार संख्या ४५ ३ ते ५५ हजार असणार आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांना कसरत होणार आहे.

### शहराचे विधानसभा आणि मतदार संख्या...

पिंपरी : 3 लाख 99 हजार 800
चिंचवड : 6 लाख 79 हजार 858
भोसरी : 6 लाख 29 हजार 129
एकूण : 17 लाख 8 हजार 787
फेब्रुवारी 2017 च्या निवडणुकीतील मतदार संख्या- 11 लाख 92 हजार 89
आगामी निवडणुकीसाठी मतदार संख्या – 17 लाख 8 हजार 787
एका प्रभागात असणार 45 ते 55 हजार मतदार

# ‘एलबीटी’ नोटीसमुळे उद्योजक हवालदिल!

## नोटीस रद्द करण्याची पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने उद्योजकांना ‘एलबीटी’ची बाकी रक्कम व्याज व शास्ती दंडासह भरण्याच्या नोटिसा पाठविल्या आहेत. सध्या वाढलेल्या कच्च्या मालाच्या किमती, वाढलेला वीजदर, लेबर तुटवडा, काम केल्यानंतर कामाचे बिल वेळेवर न मिळणे आदी कारणांनी आधीच उद्योजक हैराण झाले आहेत.**



त्यातच महापालिकेने पाठविलेल्या या नोटिशीमुळे मेटाकुटीला आलेला उद्योजक हवालदिल झाला आहे. या नोटिसा रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेमार्फत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार पिंपरी-चिंचवड शहरात आले असताना पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेमार्फत त्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, सचिव जयंत कड, संचालक नवनाथ वायाळ, भारत नरवडे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री यांनी निवेदन स्वीकारून त्या-त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर एक संयुक्त बैठक घेण्याचे निर्देश दिले. ‘एलबीटी’ बंद झाली त्याच वेळेस उद्योजकांकडून सर्व रकमेची वसुली केलेली असतानादेखील महापालिकेने एलबीटीच्या नोटिसा काढून उद्योजकांमध्ये भीतीचे वातावरण तयार केले आहे. उद्योजकांना पाठविलेल्या एलबीटीच्या नोटिसा तत्काळ रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

**सीईटीपी प्लाण्ट, घातक कचऱ्याची विल्हेवाट लावा**

औद्योगिक परिसरात भुयारी गटार योजना राबविण्यासाठी लघुउद्योग संघटना २००४पासून पाठपुरावा करीत असून, महापालिका मिळकतकरात ४ टक्के मलनिःसारण कर आकारते, मात्र सुविधा देत नाही. २०१३मध्ये सीईटीपी प्लाण्टसाठी एमआयडीसीने पालिकेला जागा दिली होती; परंतु अद्याप सीईटीपी प्लाण्ट उभारणी झालेली नाही. या प्लाण्टची जागा ‘एसपीव्ही’च्या ताब्यात मिळाली आहे. औद्योगिक परिसरातील घातक कचरा गोळा करण्यासाठी व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी एक प्लाण्ट महापालिकेने तयार करावा, असेही संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

### गाळे वाटपाची प्रक्रिया लवकर चालू करा

निवासी भागातील लघुउद्योगांचे औद्योगिक परिसरात पुनर्वसन करण्यासाठी पालिकेने एमआयडीसीकडून १९९२ मध्ये टी-२०१ हा भूखंड घेऊन प्रकल्प चालू केला होता. २५ वर्षानंतर हा प्रकल्प बऱ्याच प्रमाणात पूर्ण झाला असून या प्रकल्पात गाळा घेण्यासाठी १४४ उद्योजकांनी २००६ मध्ये पालिकेच्या आदेशानुसार निविदा फी व बुकिंग रक्कम असे ३० हजार रूपये पालिकेकडे जमा केले अहेत. सुरवातीला या गाळ्याचा दर एक हजार रूपये प्रती चौरस फुट ठरला होता. त्यानंतर पालिकेने ५६०० प्रती चौरस फुट दर ठरवला. हा दर उद्योजकांना परवडणारा नाही. त्यावर नगरपालिकेने गाळे बांधून उद्योगांना भाडे तत्वावर द्यावे व भाड्याचा दर ६ ते ७ रूपये असावा अशी सूचना लघुउद्योग संघटनेने मांडली होती. परंतु, त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. ही गाळे वाटपाची प्रक्रिया लवकर चालू करावी.अशीही मागणी पवार यांच्याकडे करण्यात आली आहे.



## भूमिका

# सत्यशोधक विचारधारेने काय साध्य केले?



**महात्मा जोतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, पण म्हणून २४ सप्टेंबर हा केवळ एका संस्थेचा १५२ वा वर्धापनदिन नाही, तर तो सामाजिक समता, बंधुत्व, न्याय, आणि मानवतेच्या मूल्यांचा प्रत्यक्ष प्रसार करणाऱ्या 'सत्यशोधक विचारधारे'चाही वाढ-दिवस आहे.**

त्या संस्थेच्या सामाजिक कार्याची, विचारसरणीची आणि मानवाधिकारांच्या संरक्षणाच्या भूमिकेची आठवण आजही ताजी असल्याची खूण पटवण्याचा हा दिवस आहे.भारताच्या समाजशास्त्रीय इतिहासाकडे पाहिल्यास, सत्यशोधक समाज हा जातीय, धार्मिक, आर्थिक आणि लिंगभेदाच्या विरोधात सतत लढणाऱ्या संघटनांमध्ये अग्रगण्य ठरतो. स्थापनेपासून आजपर्यंत, या संस्थेने महाराष्ट्रातील तसेच भारतातील कमकुवत, वंचित आणि शोषित गटांवर होणाऱ्या अन्यायावर लक्ष केंद्रित केले. सत्यशोधक समाजाने जातीय व धार्मिक भेदभावाचा निषेध केला, समाजातील असमानतेवर प्रश्न उपस्थित केला.

तसेच सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांची जोपासना केली. या संस्थेने समाजातील प्रत्येक घटकाला सामाजिक बदलासाठी सहभागी होण्याची प्रेरणा दिली, आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, समाजातील सामाजिक गतिशीलता व बंधुत्वाची भावना वाढवली.सत्यशोधक समाजाची स्थापना त्या काळातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितींचा परिणाम मानता येईल. १८७३ च्या भारतात समाजातील विविध गटांमध्ये असमानता, शोषण, जातीभेद, महिला व बालकांविरुद्ध अन्याय, गरीब व कामगार वर्गांचे हक्कांचे उल्लंघन या समस्या प्रचंड पातळीवर होत्या. त्या परिस्थितीत सत्यशोधक समाजाचा जन्म हा केवळ सामाजिक चळवळीचा भाग नव्हता, तर मानवाधिकार, समानता आणि बंधुत्व या मूल्यांच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्णायक टप्पा ठरला. महात्मा फुले यांनी या संस्थेच्या माध्यमातून शोषित गटांना न्याय मिळवून देण्याचे आणि समाजातील अन्यायपूर्ण व्यवस्थांवर प्रश्न उपस्थित करण्याचे उद्दिष्ट ठेवले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे आंदोलन समाजातील असमानता कमी करण्याचे, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे आणि सर्वसमावेशक विकास साधण्याचे माध्यम ठरले. सत्यशोधक समाजाने लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली, शोषणाविरोधात आवाज उठवण्यास प्रोत्साहित केले, आणि सामाजिक बदलासाठी ठोस उपक्रम राबवले.सत्यशोधक समाजाच्या कार्यप्रणालीमध्ये शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. शिक्षण हे केवळ विद्या प्राप्तीचे साधन नाही, तर सामाजिक समता, बोधशक्ती, आत्मनिर्भरता आणि व्यक्तिमत्व विकासाचे मुख्य आधार आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील शोषित आणि पिछडलेल्या गटांसाठी सत्यशोधक समाजाने शालेय शिक्षण, बालविकास, महिला शिक्षण आणि सामाजिक साक्षरता या क्षेत्रात कार्य केले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, शिक्षणामुळे समाजातील व्यक्तींमध्ये निर्णयक्षमता, आत्मसन्मान, सामाजिक सहभाग आणि न्यायबुद्धी विकसित होते. शाळा, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सार्वजनिक व्याख्याने या माध्यमातून लोकांमध्ये ज्ञान, संवेदनशीलता आणि सामाजिक बोध निर्माण करणे हा सत्यशोधक समाजाचा ठळक उद्देश राहिला. या उपक्रमांमुळे ग्रामीण समाजातील महिला, बालके आणि वंचित वर्गांचे सामाजिक स्थान सुधारले आणि समाजातील असमानतेवर मात करण्याची दिशा स्पष्ट झाली. महिला सक्षमीकरण हे सत्यशोधक समाजाच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टीने सक्षम करणे, ज्यामुळे लिंगभेद आणि सामाजिक असमानतेला प्रत्यक्ष उत्तर मिळते. सत्यशोधक समाजाने महिलांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, आरोग्य व पोषणाबाबत जागरूकता निर्माण केली, स्वरोजगार व कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवले, आणि समाजातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग सुनिश्चित केला. ग्रामीण भागातील महिलांना बालविवाह, कुटुंब नियोजन, आरोग्य, पोषण आणि सामाजिक हक्कांबाबत मार्गदर्शन केले गेले.

## प्रासंगिक »

### कमंडलाचे काय?

***पण उत्तर प्रदेशातील सत्तेत सहभागी असलेले काही पक्षच मुळात जातआधारित आहेत, त्यांचे काय करणार?***

उत्तर प्रदेश सरकारने जातीआधारित राजकीय मेळावे आयोजित करण्यास बंदी घातली. जातीआधारित मेळाव्यांमुळे 'दैनंदिन जीवन' (पब्लिक ऑर्डर) आणि 'राष्ट्रीय एकता' (नॅशनल युनिटी) यांस बाधा निर्माण होते असे उत्तर प्रदेश सरकारचा या संदर्भातील आदेश म्हणतो. त्या राज्याच्या मुख्य सचिवांनी सर्व जिल्हाधिकारी, पोलीसप्रमुख, सचिव आदींस पत्र लिहून राजकीय पक्षांचे "जातआधारित मेळावे, मिरवणुका, संमेलने दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण करतात आणि राष्ट्रीय एकता धोक्यात येते. सबब संपूर्ण उत्तर प्रदेश राज्यात त्यास प्रतिबंध केला जाईल", असे बजावले. तसे करताना अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या एका निर्णयाचा आधार उत्तर प्रदेश सरकार घेते. या वर्गात "आम्ही जात-पात काही पाळत नाही बुवा" असा दावा करणारे अधिक. ज्याप्रमाणे "आम्हास राजकारणातील काही कळत नाही.

आठवड्यापर्यंत दिसत होते. कुठे प्रभागांची नावेच बदललेली, महापालिकांच्या हद्दीतील गावांचा समावेशच नाही अशाही तक्रारी यात होत्याच पण जाणूनबुजून, राजकीय हिशेब करूनच आपला प्रभाग बदलला किंवा हिरावला गेल्याची तक्रार अनेक शहरांतले नगरसेवकही करत होते.

# 'लाडक्या अधिकाऱ्यांच्या' बदल्या हव्याच!

हेच नगरसेवक, अन्य कितीतरी प्रश्नांवर कसे गप्पच असतात हे लोकांना माहीत असतेच, पण त्यांच्या या आक्षेपातला कळीचा भाग असा की, अधिकाऱ्यांमध्ये निष्पक्षतेचा मूलभूत गुण गेल्या काही वर्षांत हरवलेला असल्याने, अधिकारी वर्ग हा सत्ताधाऱ्यांच्या सोयीचे प्रभाग रचताना दिसतो. त्यामुळेच हा प्रश्न केवळ प्रभाग रचनेपुरता मर्यादित नाही. हा मुद्दा एकूणच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यात निर्माण झालेल्या 'अर्थपूर्ण संबंधां'चा आहे. हाच संबंध निःपक्ष लोकशाहीस बाधा ठरत आहे. स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना पारदर्शकतेचा आणि निःपक्षतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मतदारसंघ रचना, आचारसंहिता आणि प्रशासनाची भूमिका याबाबत चर्चा होत असते; पण यामधील सर्वात गंभीर बाब म्हणजे वर्षानुवर्षे एकाच पदावर किंवा एका जिल्ह्यात टिकून राहिलेले अधिकारी. दीर्घकाळ एका ठिकाणी कार्यरत राहिल्याने



त्यांचा स्थानिक लोकप्रतिनिधींशी स्नेह दृढ होतो आणि त्यामुळे निवडणुकीचे वातावरण कलुषित होते. नागरिकांचा विश्वास डळमळीत होतो, मतदान प्रक्रियेवरील संशय वाढतो आणि अखेरीस लोकशाही व्यवस्थाच प्रश्नचिन्हाखाली येते. भारतीय राज्यघटनेनुसार लोकसभा तसेच विधानसभांच्या निवडणुकांचे नियंत्रण केंद्रीय निवडणूक आयोग करतो आणि या निवडणुकांत मतदारसंघांचे फेरसीमांकन हे फक्त जनगणनेनंतर संसदेने ठरवल्यास, निराळा 'परिसीमन आयोग' (डीलिमिटेशन कमिशन) स्थापूनच होत असते. लोकसभा मतदारसंघांची फेररचना २०२६ पर्यंत करू नये, अशी घटनादुरुस्ती अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने २००१ मध्ये केली होती. या ८४ व्या घटनादुरुस्तीचे स्वागतही झाले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रभाग रचना मात्र जबळपास दर निवडणुकीत बदलते. असे का होते, हे आधी समजून घेऊ. राज्यघटनेच्याच अनुच्छेद २४३ (झेड-ए) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाची सांवैधानिक जबाबदारी आहे. आयोगाच्या परिपत्रकांनुसार सलग तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच पदावर किंवा पाच वर्षांपेक्षा जास्त काळ एका जिल्ह्यात कार्यरत राहिलेल्या अधिकाऱ्यांची बदली करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र शासनाच्या सेवासंबंधी नियमांतही अशीच तरतूद आहे. तरीदेखील, या नियमांचे पालन अनेकदा होत नसल्याने प्रभाग रचनेतील पक्षपात, आचारसंहितेची कमकुवत अंमलबजावणी असे आक्षेप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निबडणुकांबाबत नेहमीच घेतले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

महाराष्ट्रात अतिवृष्टीचा फटका

## राज ठाकरेंचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र

# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी महाराष्ट्र सरकार खंबीरपणे उभं असून, त्यांना सर्वतोपरी मदत दिली जाईल. आतापर्यंत २,२१५ कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच प्रचलित निकषांमध्ये शिथिलता आणून शेतकऱ्यांना आणखी मदत दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. दरम्यान मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक पोस्ट लिहिली आहे. कुठल्याही निकषांशिवाय मदत द्या अशी मागणी राज ठाकरेंनी केली आहे.**

## ८ हजार रुपये तुटपुंजी भरपाई



महाराष्ट्र अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला आहे, त्याबद्दल तुम्ही पूर्णपणे अवगत असालच. महाराष्ट्राचा असा कुठलाही भाग शिल्लक राहिलेला नसेल जिथे अतिवृष्टीने नुकसान केलं नसेल. आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे. मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाली आहे... कुठल्याही निकषांच्या चौकटीत न लावता, सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा. एकरी ७ आणि ८ हजार रुपये इतक्या तुटपुंजी नुकसान भरपाईने काहीही होणार नाही. त्याऐवजी एकरी किमान ३० हजार रुपये नुकसान भरपाई घोषित करा. कारण आता शेतकऱ्याची घडी बसायला किमान १ वर्ष लागेल. २) गेल्या काही वर्षातल्या बेफाम उधळपट्टीने, राज्याची आर्थिक स्थिती नाजूक झालेली असली तरी, सरकारने हात आखडता घेऊ नये. वेळेस केंद्राकडे पाठपुरावा करावा आणि मदतीचं पॅकेज केंद्राकडून मिळवावं. केंद्र सरकारने बिहारला असं पॅकेज या आधी दिलं आहेच त्यामुळे महाराष्ट्राला द्यायला काही हरकत नसावी. आणि त्यासाठी दिल्लीचा जो काही पाठपुरावा करावा लागेल तो करावा. फक्त स्वतःच्या वैयक्तिक तक्रारींसाठी किंवा घटक पक्षातील संघर्षासाठी आम्ही दिल्लीत जातो असं चित्र न दिसता, सरकारमधले सगळे पक्ष राज्यासाठी पण दिल्लीत धाव घेतात हे पण राज्याला दिसू दे.अशा आपत्तीचा पहिला फटका बसतो तो मुला-मुलींच्या शिक्षणाला. एकाही मुलाचं शिक्षण बंद होणार नाही. त्याला लागणारी वह्या-पुस्तकं मिळतील आणि अशा परिस्थितीत सहामाही परीक्षा देताना मुलांच्या मनाची काय स्थिती असेल याचा सरकारने विचार करून काही कृती तात्काळ करावी. हिंदी भाषा लादताना दाखवलेली चपळाई आणि आग्रहीपणा इथे पण दिसेल अशी अपेक्षा. या अशा आपत्तीनंतर रोगराई प्रचंड वाढते त्यासाठी राज्याचा आरोग्य विभाग सतर्क राहील हे देखील सरकारने पहावं. जिल्हा रुग्णालयांपासून ते आरोग्य केंद्रांपर्यंत, सगळीकडे औषधांचा तुटवडा पडणार नाही हे सरकारने पहावं. अशा संकटानंतर कर्जाच्या हप्त्यासाठी सुरु होणारा बँकांचा तगादा हा फारच तापदायक विषय असतो. एकतर बँकांना योग्य ती समज सरकारने आत्ताच द्यावी, अन्यथा आमचे महाराष्ट्र सैनिक ती देतीलच.सरकारने बांधावर जाऊन शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे हे सरकारचं कामच आहे. पण त्याची जाहिरातबाजी ही महाराष्ट्राची संस्कृती नव्हती. त्यामुळे या सगळ्या मोहापासून दूर राहून सरकारने, प्रशासनाने आता एकरी किमान ३० ते ४० हजाराची मदत घोषित करावी आणि शेतकरी आणि त्याचं कुटुंब पुन्हा उभं राहील हे पहावं. महाराष्ट्रात अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला आहे,महाराष्ट्राचा असा कुठलाही भाग शिल्लक राहिलेला नसेल जिथे अतिवृष्टीने नुकसान केलं नसेल. आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे.

### नुकसान भरपाई घोषित करा

मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाली आहे... कुठल्याही निकषांच्या चौकटीत न लावता, सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा. एकरी ७ आणि ८ हजार रुपये इतक्या तुटपुंजी नुकसान भरपाईने काहीही होणार नाही. त्याऐवजी एकरी किमान ३० हजार रुपये नुकसान भरपाई घोषित करा.

# मंत्र्यांचे पर्दाफाश होणे आवश्यक

## वनमंत्री गणेश नाईक यांचा राज्य सरकारला घरचा आहेर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारमधील काही मंत्री तसेच राजकारणातील काही मंडळी यांचे हात बरबटलेले असल्याचे आरोप करत अशा माखलेल्या मंडळींचे बुरखे फाडले गेले पाहिजे असे स्पष्ट मत गणेश नाईक यांनी व्यक्त केले. राज्य सरकारमध्ये सर्व अलबेल असल्याचेसांगितले जात असताना वनमंत्री गणेश नाईक यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे**




विक्रमगड येथे जिल्ह्यातील चौथा जनता दरबार च्या आरंभी नागरिकांना संबोधन करताना गणेश नाईक यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी आमदार हरिश्चंद्र भोळे, आमदार राजेंद्र गावित तसेच जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.अधिकारी वर्गाला पूर्वग्रह ठेवून बदनाम करण्यात येऊ नये असे सांगताना मंत्री अथवा लोकप्रतिनिधी यांच्याकडून बेकायदेशीर कामांची शिफारस झाल्यास त्यावर कागदोपत्री पूर्तता करण्याचा शेरा करून प्रकरण पुनरालोकन करण्यासाठी पुन्हा कनिष्ठ पातळीवर पाठवले पाहिजे असे सांगितले. लोकाभिमुख कार्यभार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एकत्रितपणे काम करावेब्लॅकमेलिंग करणारी मंडळी सध्या वावरत असून लोकाभिमुख कारभार त्यांच्याविरुद्ध देखील कारवाई करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

### मंडळींचे बुरखे फाडले गेले पाहिजे

नेता नसल्याचे त्यांनी सांगत पुन्हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरुद्ध अप्रत्यक्षपणे तोफ डागली. गेल्या आठवड्यात आपला ७५वा वाढदिवस कार्यकर्त्यांनी साजरा केल्याचा उल्लेख करत लोकसेवेत वय हे महत्वाचं नसते असे गणेश नाईक यांनी ठणकावून सांगितले. अनेक अधिकारी, राजकीय मंडळी वयाने तरुण असली तरी मनाने थकलेली असल्याने त्यांच्याकडून अपेक्षित काम होत असल्याचे सांगत या वयात देखील आपल्यातील काम करण्याची उमेद कायम असल्याचे गणेश नाईक यांनी सांगितले.राज्य सरकारमधील काही मंत्री तसेच राजकारणातील काही मंडळी यांचे हात बरबटलेले असल्याचे आरोप करत अशा माखलेल्या मंडळींचे बुरखे फाडले गेले पाहिजे .

कबर हटवण्याची मागणी

## अफजल गुरूची तिहार कबर हटवण्याची मागणी

# अंत्यसंस्काराचा आदर केला पाहिजे

## दिल्ली हायकोर्टाने फेटाळली



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तिहार तुरुंगातून दहशतवादी अफजल गुरू आणि मकबूल भट यांच्या कबरी हटवण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी नकार दिला मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेऊन हा निर्णय सरकारने घ्यायचा आहे, त्यामुळे कबरी हटवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर ते सुनावणी घेऊ शकत नाहीत. तरीही, कबरी तीर्थक्षेत्र किंवा स्मारके बनू शकत नाहीत, या याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादाशी न्यायालयाने सहमती दर्शवली. याबाबत बार अँड बेंचने वृत्त दिले आहे.**

मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने म्हटले की, तुरुंगाच्या आवारात अंत्यसंस्कार किंवा दफन करण्यास मनाई करणारा कोणताही कायदा किंवा नियम नाही. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना जनहित याचिका मागे घेण्याची आणि आवश्यक असल्यास संबंधित पुराव्यांसह ती पुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली.मकबूल भट याच्या फाशीनंतर १२ वर्षांनी याचिका का दाखल केली जात आहे, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. तिहार तुरुंग हे सरकारी मालकीचे आहे आणि ते सार्वजनिक ठिकाण नाही, असे नमूद करून, कबरींमुळे इतर कैद्यांना त्रास होत आहे किंवा त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचा दावाही न्यायालयाने फेटाळून लावला.तुरुंगात दफनविधीला परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा आहे. अंत्यसंस्काराचा नेहमी आदर केला पाहिजे आणि कोणताही नियम तुरुंगाच्या आवारात अंत्यसंस्कार किंवा दफन करण्यास मनाई करत नाही", असे खंडपीठाने म्हटले आहे.याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, तिहारमधील कबरींमुळे तुरुंगाचे "कट्टरपंथी तीर्थस्थळात" रुपांतर झाले आहे. तिथे काहीजण दहशतवाद्यांची प्रार्थना करण्यासाठी एकत्र येतात. याचिकेत असेही म्हटले आहे की, यामुळे केवळ राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचीच हानी होत नाही, तर दहशतवादाला प्रोत्साहन मिळते, जे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे आणि कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे अफजल गुरू आणि मकबूल भट यांच्या कबरी गुप्त ठिकाणी हलवण्याची विनंतीही करण्यात आली होती.मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने म्हटले की, तुरुंगाच्या आवारात अंत्यसंस्कार किंवा दफन करण्यास मनाई करणारा कोणताही कायदा किंवा नियम नाही. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना जनहित याचिका मागे घेण्याची आणि आवश्यक असल्यास संबंधित पुराव्यांसह ती पुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली.मकबूल भट याच्या फाशीनंतर १२ वर्षांनी याचिका का दाखल केली जात आहे, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. तिहार तुरुंग हे सरकारी मालकीचे आहे आणि ते सार्वजनिक ठिकाण नाही, असे नमूद करून, कबरींमुळे इतर कैद्यांना त्रास होत आहे किंवा त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचा दावाही न्यायालयाने फेटाळून लावला.तुरुंगात दफनविधीला परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा आहे. अंत्यसंस्काराचा नेहमी आदर केला पाहिजे आणि कोणताही नियम तुरुंगाच्या आवारात अंत्यसंस्कार किंवा दफन करण्यास मनाई करत नाही", असे खंडपीठाने म्हटले आहे.याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, तिहारमधील कबरींमुळे तुरुंगाचे "कट्टरपंथी तीर्थस्थळात" रुपांतर झाले आहे. तिथे काहीजण दहशतवाद्यांची प्रार्थना करण्यासाठी एकत्र येतात. याचिकेत असेही म्हटले आहे की, यामुळे केवळ राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचीच हानी होत नाही, तर दहशतवादाला प्रोत्साहन मिळते,

### गुप्त ठिकाणी हलवण्याची विनंती

कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे अफजल गुरू आणि मकबूल भट यांच्या कबरी गुप्त ठिकाणी हलवण्याची विनंतीही करण्यात आली होती.तिहार तुरुंगातून दहशतवादी अफजल गुरू आणि मकबूल भट यांच्या कबरी हटवण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी नकार दिला मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठाने म्हटले आहे.

# लडाखमध्ये जमवाने भाजपा कार्यालय पेटवलं

## राज्याचा दर्जा मिळावा यासाठी हिंसक आंदोलन,पोलिसांवर दगडफेक




।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लडाखचा सहाव्या अनुसूचित समावेश करावा आणि केंद्रशासित प्रदेशाऐवजी राज्याचा दर्जा मिळावा अशी मागणी गेल्या काही महिन्यांपासून होत आहे. अलीकडेच ही मागणी घेऊन लडाखमधील नागरिकांनी ठिकठिकाणी आंदोलनं सुरू केली आहेत. या आंदोलनाने बुधवारी (२४ सप्टेंबर) हिंसक वळण घेतलं.**

संतप्त जमावाची पोलिसांबरोबर झडप झाली. तसेच जमावाने पोलिसांवर दगडफेकही केली. आंदोलकांनी लेह येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयावर दगडफेक करत कार्यालय पेटवून दिल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. तसेच काही ठिकाणी पोलिसांना आंदोलकांवर लाठीहल्ला करावा लागला. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली लडाखमध्ये विद्यार्थी आंदोलन करत आहेत. विद्यार्थ्यांचं शांततेच्या मार्गाने चाललेलं आंदोलन बुधवारी हिंसक बनलं. वांगचूक हे गेल्या १५ दिवसांपासून बेमुदत उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या या आंदोलनाच्या चार प्रमुख मागण्या आहेत. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा ही त्यापैकी पहिली मागणी आहे. तसेच लडाखचा संविधानाच्या सहाव्या अनुसूचित समावेश करावा, कारगिल व लेह या दोन जिल्ह्यांना लोकसभा मतदारसंघ घोषित करावं आणि लडाखमधील शासकीय नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना प्राधान्य मिळावं या मागण्यांसह लडाखमधील विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत.

### लडाखला राज्याचा दर्जा मिळावा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० हटवलं, तसेच जम्मू काश्मीरचा पूर्ण राज्याचा दर्जा हटवला. त्यानंतर जम्मू-काश्मीर हा एक वेगळा केंद्रशासित प्रदेश घोषित केला. मात्र, मागील तीन वर्षांपासून लडाखमधील लोक सातत्याने त्यांची जमीन, संस्कृती आणि संसाधनांच्या संरक्षणासाठी लडाखला राज्याचा दर्जा मिळावा



# पाचव्या दिवशी केली जाते स्कंदमातेची पूजा

वरात्रीचा पाचवा दिवस स्कंदमातेला समर्पित असतो. या दिवशी स्कंदमातेची विधीवत पूजा, अर्चना केली जाते. स्कंदमाता हे देवी पार्वतीचे दुसरे रूप मानले जाते. तिच्या मुलाचे नाव स्कंदकुमार असल्याने तिचे नाव स्कंदमाता पडले. शास्त्रानुसार स्कंदमाता नकारात्मक शक्तींचा नाश करून जीवनात सुख-समृद्धी आणते.

## स्कंदमातेची पूजा विधी आणि मंत्र

सर्व प्रथम ब्रह्म मुहूर्तावर उठून स्नान करावे. त्यानंतर पिवळे वस्त्र परिधान करून स्कंदमातेच्या मूर्तीसमोर किंवा प्रतिमेसमोर बसावे. देवीला पिवळी फुले व हार अर्पण करून पिवळ्या वस्तू अर्पण करा. देवीच्या मूर्तीसमोर दिवा लावा आणि व्रत कथा वाचावी. यानंतर मंत्रोच्चार करून देवीची आरती करावी.



## स्कंदमातेची व्रत कथा

धार्मिक मान्यतेनुसार, तारकासुर नावाचा एक असुर होता. तारकासुरला वाटले की महादेवाचे लग्न होणार नाही आणि त्यांना पूत्रही होणार नाही. त्यामुळे तो अमर आहे. तारकासुराने देवलोकात दहशत निर्माण केली तेव्हा सर्व देवतांनी महादेवाला लग्न करण्याची विनंती केली. महादेवाने माता पार्वतीशी विवाह केला आणि स्कंदकुमार नावाच्या पुत्राला जन्म दिला आणि त्याने तारकासुराचा अंत केला.

## -: मंत्र :-

या देवी सर्वभूतेषु
मातृरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नम।।
सिंहासनगता नित्यं
पद्माश्रितकरद्वया।
शुभदास्तु सदा
देवी स्कन्दमाता यशस्विनी।।

स्कंदमातेची आरती
जय तेरी हो स्कंद माता,
पांचवा नाम तुम्हारा आता।
सब के मन की जानन हारी,
जग जननी सब की महतारी।
तेरी ज्योत जलाता रहूं मैं,
हरदम तुम्हे ध्याता रहूं मैं।

कई नामो से तुझे पुकारा,
मुझे एक है तेरा सहारा।
कहीं पहाड़ों पर है डेरा,
कई शहरों में तेरा बसेरा।

हर मंदिर में तेरे नजारे गुण गाये,
तेरे भगत प्यारे भगति।
अपनी मुझे दिला दो शक्ति,
मेरी बिगड़ी बना दो।

इन्दर आदी देवता मिल सारे,
करे पुकार तुम्हारे द्वारे।
दुष्ट दत्य जब चढ़ कर आये,
तुम ही खंडा हाथ उठाये।
दासो को सदा बचाने आई,
चमन की आस पुजाने आई।

## निवड प्रक्रियेवर टीका

## आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी सरकारचे कठोर निकष

# खेळाडूंच्या अतिरिक्त सहाय्यकांवर निर्बंध

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ सुपर फोरमधील चार संघांमधील लढत अधिक अटीतटीची होत आहे. भारत आणि बांगलादेश यांचे एकेक सामने झाले आहेत. तर पाकिस्तान व श्रीलंका यांचे दोन सामने झाले आहेत. यानंतर आता गुणतालिका पाहता भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होऊ शकतो. पाकिस्तानच्या विजयानंतर गुणतालिकेचं कसं चित्र आहे पाहूया.**

## निवड प्रक्रिया अधिक कडक केली



क्रीडा मंत्रालयाने बुधवारी आपल्या संकेतस्थळावर आशियाई क्रीडा स्पर्धेचे निवड निकष प्रसिद्ध केले. या पाच पानी पत्रकात आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक जिंकण्याची सर्वाधिक शक्यता असलेल्या खेळाडूंनाच प्राधान्य दिले जाईल, तसेच आशियाई स्तरावर वैयक्तिक खेळात पहिल्या सहामध्ये आणि सांघिक खेळात पहिल्या आठमध्ये असलेल्या खेळाडू आणि खेळांना नामांकनासाठी पात्र धरण्यात येईल, खेळाडूला स्वखर्चाने अतिरिक्त सहाय्यक प्रशिक्षक नेण्यास मान्यता नसेल, अशा प्रमुख आणि कठोर निकषांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत जपानच्या नागोया येथे होणार आहे.याआधी बहुविध आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी संघ किंवा खेळाडू निवड प्रक्रियेवर कायमच टीका झाली आहे. हे प्रसंग वारंवार येऊ नयेत यासाठीच क्रीडा मंत्रालयाने निवड प्रक्रिया अधिक कडक केली आहे. एखादा खेळाडू किंवा संघांचे उद्दिष्ट पदक जिंकण्याचे नसून, केवळ सहभागाचे असल्याचे मंत्रालय आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साइ) निदर्शनास आल्यास अशा खेळाडू किंवा संघास मंजुरी मिळणार नाही, असेही या पत्रकात म्हणण्यात आले आहे.

ऑलिम्पिक आणि अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडू किंवा संघाचा सहभाग हा आंतरराष्ट्रीय महासंघांनी निश्चित केलेल्या पात्रता निकषानुसार केला जातो. अशा स्पर्धा या नव्या क्रीडा धोरणातून वगळण्यात आल्या आहेत. क्रीडा मंत्रालयाने विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी संघ पाठविण्याकरिता एक धोरणही निश्चित केले आहे. ज्या खेळांच्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धा उरकल्या जात आहेत किंवा त्यांचा दर्जा कमी आहे आणि प्रमुख देश सहभागी होणार नसतील, अशा स्पर्धेत भारतीय संघास मान्यता मिळणार नाही, असे क्रीडा मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा (२०२५-२६), पॅरा आशियाई, आशियाई इनडोअर, आशियाई बीच स्पर्धा, युवा ऑलिम्पिक, आशियाई युवा आणि राष्ट्रकुल युवा स्पर्धा. (या स्पर्धांसाठी अखेरच्या १२ महिन्यांतील कामगिरी लक्षात घेतली जाईल.सांघिक खेळात आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सहापेक्षा कमी संघ असतील, तर अशा स्पर्धेत भारतीय संघ पहिल्या दोनमध्ये येणे आवश्यक. त्या संघाला आशियाई क्रीडा स्पर्धेत संधी मिळणार.आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत ६ ते १२ संघ असतील, तर भारतीय संघ पहिल्या चारमध्ये येणे आवश्यक. ज्या खेळांच्या आशियाई स्पर्धा द्वैवार्षिक पद्धतीने होतात आणि गेल्या वर्षभरात कोणतीच स्पर्धा झाली नसेल, तर मागील दोन वर्षांच्या कालावधीतील सर्वात अलीकडच्या स्पर्धेतील कामगिरीचा विचार करणार. अखेरच्या आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर दोन वर्षांत झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी विचारात घेतली जाणार नाही.वैयक्तिक क्रीडा प्रकारात खेळाडू आशियाई क्रमवारीत किंवा नजीकच्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत पहिल्या सहांत असणे आवश्यक.

## निकषाचा फटका कोणाला?

हे प्रसंग वारंवार येऊ नयेत यासाठीच क्रीडा मंत्रालयाने निवड प्रक्रिया अधिक कडक केली आहे.एखादा खेळाडू किंवा संघांचे उद्दिष्ट पदक जिंकण्याचे नसून, केवळ सहभागाचे असल्याचे मंत्रालय आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साइ) निदर्शनास आल्यास अशा खेळाडू किंवा संघास मंजुरी मिळणार नाही, असेही या पत्रकात म्हणण्यात आले आहे.

आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी या कठोर निकषांचा फटका फार कमी खेळांना बसणार आहे. भारताने अखेरच्या २०२३ हांगझो आशियाई क्रीडा स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करताना २८ सुवर्णपदकांसह १०६ पदके जिंकली होती. या वेळी फक्त फुटबॉल खेळाचा समावेश अवघड आहे. कारण सध्या ‘फिफा’ क्रमवारीत आशियाई संघांत भारत २४व्या स्थानावर आहे.क्रीडा मंत्रालयाने बुधवारी आपल्या संकेतस्थळावर आशियाई क्रीडा स्पर्धेचे निवड निकष प्रसिद्ध केले. या पाच पानी पत्रकात आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक जिंकण्याची सर्वाधिक शक्यता असलेल्या खेळाडूंनाच प्राधान्य दिले जाईल, तसेच आशियाई स्तरावर वैयक्तिक खेळात पहिल्या सहामध्ये आणि सांघिक खेळात पहिल्या आठमध्ये असलेल्या खेळाडू आणि खेळांना नामांकनासाठी पात्र धरण्यात येईल, खेळाडूला स्वखर्चाने अतिरिक्त सहाय्यक प्रशिक्षक नेण्यास मान्यता नसेल, अशा प्रमुख आणि कठोर निकषांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत जपानच्या नागोया येथे होणार आहे.याआधी बहुविध आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी संघ किंवा खेळाडू निवड प्रक्रियेवर कायमच टीका झाली आहे.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर मोठा विजय

## युथ वनडे मालिकाही केली नावे; वैभव, आयुष, विहान ठरले हिरो

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या अंडर-१९ संघाने ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाला सलग दुसऱ्या युथ वनडे सामन्यात पराभवाचं पाणी पाजलं. भारताने दुसऱ्या युथ वनडेमध्ये ऑस्ट्रेलियावर ५१ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाविरूद्ध तीन सामन्यांची युथ वनडे मालिका २-० च्या फरकाने आपल्या नावे केली आहे. या सामन्यात भारताकडून वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा आणि अभिज्ञान कोंडू यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली.**



## अभिज्ञानने ७१ धावांची खेळी केली

पण त्याने गोलंदाजीत तीन बळी घेत मोठी कामगिरी केली.ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध १०९ धावांवर सहा विकेट्स गमावल्या. त्यानंतर जेडेन ड्रेपरने एका टोकाला उभं राहत १०७ धावा केल्या, परंतु तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. त्याने आर्यन शर्मासह सातव्या विकेटसाठी ७५ चेंडूत ११२ धावांची भागीदारी केली.

ऑस्ट्रेलियाकडून जेडन ड्रेपर याने शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. ड्रेपरने ६५ चेंडूत उत्कृष्ट शतकी खेळी केली, पण भारतीय गोलंदाजीसमोर तो संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकला नाही. ड्रेपरच्या शतकानंतरही ऑस्ट्रेलियाचा संघ २४९ धावांवर सर्वबाद झाला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ३०० धावा केल्या. ज्यामध्ये वैभव सूर्यवंशी ७० धावा, विहान मल्होत्रा ७० धावा तर अभिज्ञान कोंडू यांनी ७१ धावांच्या खेळी केल्या. भारताने या सामन्यात नाणेफेक गमावली, पण त्यांना प्रथम फलंदाजी करण्याची संधी देण्यात मिळाली आणि आयुषच्या संघाने ४९.४ षटकांत ३०० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाला ४७.२ षटकांत केवळ २४९ धावा करता आल्या.ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताच्या ३०० धावांच्या भागीदारीत वैभव, विहान आणि अभिज्ञान यांच्या अर्धशतकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वैभवने ६८ चेंडूत ७० धावा केल्या, तर विहाननेही ७४ चेंडूत ७० धावा केल्या. त्यानंतर अभिज्ञानने ६४ चेंडूत ७१ धावांची जलद खेळी केली. दुसऱ्या सामन्यात कर्णधार आयुष खातंही उघडण्यात अपयशी ठरला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। गुरुवार।

। दि. 25 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचालित

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत यश

## शिक्षण विश्व: "उडान 3" राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांकासह अनेक पारितोषिके




। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचालित रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर मध्ये केलेल्या डान्स विथ म्युझिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या "उडान 3" या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक सह अनेक पारितोषिके पटकावली आहेत..**

या स्पर्धेत महाराष्ट्रातून चाळीसपेक्षा जास्त शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पीसीइटीच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, एस.बी.पाटील पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी आदी उपस्थित होते. एस.बी. पाटील पब्लिक स्कूल, रावेतच्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी ते सहावी लोककला शैली प्रथम पारितोषिक पटकावले. तर इयत्ता चौथी ते सहावी खुल्या शैलीत द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. तसेच इयत्ता सातवी ते दहावी शास्त्रीय नृत्यात द्वितीय पारितोषिक मिळाले. कला शिक्षक अजय चावरिया यांना सर्वोत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांना मिळालेले यश हे सर्जनशीलता, नृत्यकलेचा सन्मान असल्याचे प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले. तसेच त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. न

---

# महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा भव्य देखावा

## कीर्तीताई मारुती जाधव युथ फाउंडेशन आणि श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान यांचे आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : कीर्तीताई मारुती जाधव युथ फाउंडेशन आणि श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने, पिंपरी चिंचवड शहरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा भव्य देखावा साकारण्यात आला आहे.**



याबाबत माहिती देताना जाधव म्हणाल्या नवरात्रोत्सव हा एक अत्यंत पवित्र व्रत आहे, ज्यामध्ये देवीच्या विविध प्रतिमांचे दर्शन घडते आणि भक्तिभाव जागृत होतो. भारतातील सर्व शक्तिपीठांमध्ये महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे विशेष स्थान आहे. याच शक्ती रूपाचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न यंदा आम्ही केला आहे.

साडेतीन शक्तिपीठांमध्ये समावेश असलेल्या कोल्हापूरच्या अंबाबाई, तुळजापूरच्या तुळजाभवानी माता, माहूरच्या श्री रेणुकादेवी आणि सप्तश्रृंगी माता यांचा भव्य देखावा पिंपरी चिंचवडमध्ये पाहायला मिळेल. हे शक्तिपीठ भक्तांना अतिशय आकर्षक व भव्यपणे सादर केले गेले आहेत, जे नवरात्रोत्सवाच्या रंगात आणखी भर टाकतात.

संयोजिका जाधव यांनी सर्व देवी भक्तांना आव्हान केले आहे की, ते या देखाव्याचे दर्शन घ्यावेत आणि नवरात्रोत्सवाच्या आध्यात्मिक अनुभवाचा लाभ घ्यावा.



राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान इंद्रायणी नगरच्या नम्रता योगेश लोंढे (नगरसेविका पिं चिं मनपा) व (संस्थापक राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान) योगेश भगवान लोंढे यांच्या वतीने शारदीय नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यंदाचे हे 19 वे वर्ष आहे.




College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046